**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
**कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,**
**पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३**
**deptfc-pcpc@mah.gov.in**

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/१५१४५१५४६/२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक-१६/११/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने २०७ भोसरी विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. महेशदादा लांडगे यांचे प्रचारार्थ मा.श्री योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश राज्य हे दिनांक १७/११/२०२४ रोजी प्रचार सभेकरीता गावजत्रा मैदान भोसरी येथे उपस्थित राहणार आहेत. सदर सभेच्या अनुषंगाने पुणे नाशिक महामार्गावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने सदर मार्गावरील वाहतुक अन्य मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### भोसरी वाहतुक विभाग अंतर्गत

१) पुणे नाशिक महामार्गावरील गुडविल चौक येथे नाशिक फाटा ते भोसरी,चाकणकडे जाणा-या सर्व वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :-** सदर मार्गावरील वाहने पुणे नाशिक महामार्गावरील → गुडविल चौक येथुन→ लेफ्ट टर्न घेऊन →एमआयडीसी चौक सरळ→ गुजर गॅस लेफ्ट टर्न → फुलेनगर झोपडपट्टी उजवीकडे वळून → पीएमपीएमएल वर्क शॉप,नेहरुनगर येथुन लेफ्ट टर्न → हॉकी स्टेडियम सरळ अनुकूल चौक पुढे स्पाईन रोडने → स्पाईन मॉल चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२)पुणे नाशिक महामार्गावरील भोसरी ओव्हर ब्रीज हा सर्व प्रकारच्या वाहनांना जाणे-येण्याकरिता बंद करण्यांत येत आहे.

**पर्यायी मार्ग :-** सदर मार्गावरील वाहने नाशिक → पुणे महामार्गावरुन चाकणकडून नाशिक फाटा जाणारी वाहने ही भोसरी ओव्हर ब्रीजवर न जाता भोसरी सर्व्हिस रोडने पीएमटी चौक,दिघी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

तरी वरील नमुद मार्गावर सभेच्या अनुषंगाने दि.१७/११/२०२४रोजी दुपारी १५.३० ते सायंकाळी १९.०० वा पर्यंत अथवा प्रचार सभा संपेपर्यंत (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून) आवश्यकतेनुसार वाहतुक बदल करण्यात येत असुन अधिसुचना (नोटीफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

Scanned with CamScanner

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी भोसरी वाहतुक विभाग

/- वाहतूक बदलाचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटीग व बंदोबस्त लावून वाहतुक पर्यायी मार्गाने वळवावी.

Scanned with CamScanner